ISBN - 978-93-91305-33-8

# संत साहित्य, कार्य : चर्चा व चिंतन



संपादक
प्रा. डॉ. पंकज श्यां. वानखेडे

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

ISBN-978-93-91305-33-8

संत साहित्य कार्य: चर्चा व चिंतन

■ प्रा. डॉ. पंकज शं. वानखेडे

■ प्रथम आवृत्ती – २८ सप्टेंबर ,२०२१

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-33-8

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8


| | | |
|---|---|---|
| 12 | संत तुकाराम महाराजांचे समाज प्रबोधनात्मक विचारप्रा. सुपारे यु.पी. | 73 |
| 13 | थोर समाजसुधारक : संतकवी तुकाराम प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 81 |
| 14 | संत तुकारामांचे सामाजिक विचार प्रा.डॉ.शिल्पा दिपक काकडे | 87 |
| 15 | संत तुकाराम महाराज यांचे सांस्कृतिक व समाज प्रबोधनात्मक विचार प्रा. प्रफुल ई. ढोके | 91 |
| 16 | तुकाराम महाराज यांचें सामाजिक विचार प्रा.डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे | 98 |
| 17 | तुकाराम महाराज आणि त्यांचे चौदा टाळकरी डॉ. न. ह. खोडे | 102 |
| 18 | संत तुकाराम यांचे विद्रोही विचार प्रा.डॉ. वंदना भोयर | 110 |
| 19 | संत बहिणाबाईच्या काव्यातील विद्रोह (विशेष संदर्भ—आत्मचरित्र व वज्रसूची) डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 114 |
| 20 | संत गाडगेबाबांचे दशकलमी तत्त्वज्ञान प्रा.डॉ.गजानन एस. फुटाणे | 126 |
| 21 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक विचार प्रा. विजय डी. वाकोडे | 132 |
| 22 | भजनातून क्रांती घडविणारा संत : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रा. डॉ.विजय राऊत | 137 |
| 23 | आधुनिक संत - राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | 144 |
| 24 | ग्रामगीतेतील राष्ट्रसंतांचे कृषि विषयक विचार अभिनव गजानन फुटाणे | 149 |


Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

# संत बहिणाबाईच्या काव्यातील विद्रोह
## (विशेष संदर्भ—आत्मचरित्र व वज्रसूची)

डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे
मराठी विभाग प्रमुख, मशिसे गट—अ, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.,मो.नं. ७७९८१७७४७३.

प्रपंच आणि परमार्थ दोन्ही एकाच वेळी करुन जीवनमुक्त स्थिती प्राप्त करुन घेणा—या योगिनी म्हणजे संत बहिणाबाई होत. संत बहिणाबाई स्वत:ला तुकारामशिष्य म्हणून घेतात. वास्तविक पाहता संत तुकारामांनी

स्वत: कोणाही व्यक्तीचे गुरुपद किंबहुना गुरुत्व स्वीकारलेले नाही. संत बहिणाबाईच्या चरित्राचा विचार केला तर ते एका दृष्टीने चमत्कृतिपूर्ण आहे तर दुस—या अंगाने विचार केल्यास त्याला अत्यंतिक कारण्याची किनार आहे. संत तुकारामांचा आध्यात्मिक आधिकार श्रेष्ठ असल्यामुळे बहिणाबाई यांनी त्यांना शिष्य मानणे स्वाभाविक होते. संत बहिणाबाई स्वत: अध्यात्म क्षेत्रात आधिकार संपन्न झाल्या होत्या. काव्यक्षेत्रात त्यांचे योगदान खूपच मौलिक आहे. त्यांचा खालील अजरामर अभंग सदैव साक्ष देतो.

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।
नामा तयाचा किंकर। तेणे रचिले आवार ।।
जनार्दनी एकनाथ। खांब दिला भागवत।।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।
बहेणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपण केलें वोजा।।

संत बहिणाबाई यांचा (इ.स.१६१८ ते इ.स. १७००) कालखंड हा संत तुकारामांचा समकालीन आहे. त्यांना संत तुकारामांच्या प्रत्यक्ष सहवास लाभला, असा आवर्जून उल्लेख आत्मनिवेदनपर अभंगात त्यांनी केला. वहिणाबाईंनी आपले जीवनचरित्रच आत्मनिवेदनात्मक अभंगात मांडले आहे.

संत बहिणाबाईचे आत्मचरित्र हे त्यांचे आत्मनिवेदनपर जे अभंग आहेत त्यामध्ये आलेले आहे त्यांच्या अभंगाचा गाथा हा श्री. धोंडो विश्वनाथ उमरखाने यांनी 'संत बहिणाबाईकृत' कवितासंग्रह या नावाने १९१३ मध्ये प्रकाशित केला. यामध्ये त्यांच्या ४६८ रचना प्रकाशित



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

झाल्या होत्या. श्री विश्वनाथ नारायण कोल्हटकर यांनी इ.स. १९२६ मध्ये 'बहिणाबाईचा गाथा' प्रकाशित केला. या गाथेमध्ये एकंदर ७४९ पदे, अभंग, इत्यादी रचना आल्या आहेत. या संदर्भात वासुदेव सीताराम बेंद्रे लिहितात'' दोन्ही प्रसिध्द प्रतीत अभंगाचा अनुक्रम, विषयवारी, व अभंगाची संख्या भिन्न आहे. किरकोळ पाठभेदही इतस्ततः आढळतात. अशा परिस्थितीत दोन्ही प्रती भिन्न होत्या असे मानल्याखेरीज गत्यंतर नाही.[१]'' काहीही असले तरी हया दोन्ही प्रती प्रारंभीच्या असल्याने हयांना महत्व आहे हे मान्य करावे लागते. गाथेतील बराचसा भाग हा आत्मचरित्रात्मक आहे. त्यावरुन त्यांच्या चरित्राचा उलगडा होतो. याशिवाय तो समकालिन असल्यामुळे त्याची विश्वासहार्यता अधिक आहे. बहिणाबाईच्या शिऊरला संस्थानामधून जी आज प्रत विक्रीस उपलब्ध आहे. ती ह.अ.भावे[२]'' यांनी प्रकाशित केलेली आहे. त्यांमध्ये त्यांनी ७४० अभंगाचा उल्लेख केलेला आहे.

आत्मनिवेदनपर अभंगाच्या संख्येत देखील मतभेद आहेत. ह.अ. भावे यांच्या प्रतीत ही संख्या सुमारे अठ्ठयाहत्तर दिली आहे. तर ल.रा. नसिराबादकर[३]'' यांनी बहिणाबाईचे वेगळेपण सांगताना त्यांनी लिहून ठेवलेल्या बावन्न (५२) अभंगातील आत्मचरित्रांचा उल्लेख केला आहे. 'संत बहिणाबाईची गाथा' शालिनी जावडेकर सन १९७९ या ग्रंथात बहिणाबाईच्या जवळजवळ साडेसातशे रचना आढळतात. प्रस्तुत लेखात संत बहिणाबाईच्या आत्मनिवेदनपर अभंगाचा विचार केला आहे, तद्वतच बहिणाबाईच्या आत्मचरित्रातून व वज्रसूचीतून व्यक्त झालेल्या विद्रोहाच्या व पुरोगामित्वाच्या नोंदी घेतल्या आहेत.

संत बहिणाबाई यांच्या काव्याचे वेगळेपण हे त्यांच्या आत्मचरित्रात्मक अभंगामुळे आहे. देवगाव माझे माहेर साजनी। वेरुळ तेथोनी पूर्वभागी।। अशा संवादात्मक शैलीत या आत्मचरित्राची सुरुवात होते. वेरुळ येथील देवगाव (रंगारी) येथे. आऊजी कुलकर्णी व त्यांच्या पत्नी जानकीबाई या दांम्पत्याच्या पोटी बहिणाबाईचा जन्म झाला. बहिणाबाई केवळ तीन वर्षांच्या असतांना त्यांच्या विवाह तीस वर्ष वयाच्या रत्नाकार पाठक नावाच्या शिऊर येथील बिजवराशी झाला. हे गौतम गोत्री, वेदपाठी, शक्तीची उपासना करणारे कर्मठ वृत्तीचे, भिक्षूक, ज्योतिषाचा धंदा करणारे, अत्यंत तापट स्वभावाचे, 'अग्निजैसे तामसी' वृत्तीचे होते. बहिणाबाईच्या लग्नामुळे त्यांच्या आईवडिलांना कर्जबाजारी व्हावे लागले. त्यासाठी 'गोत्रज', शेत, मळा लिहून मागू लागले.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

बहिणाबाईच्या आईवडिलांसमोर मोठे संकट निर्माण झाले. यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी आपल्या जावयाला बोलावले. मात्र कर्जाची फेड करणे अशक्य असल्यामुळे त्यांना गाव सोडून जाण्याशिवाय पर्याय राहिला नाही. वयाच्या आठव्या वर्षी या कुटुंबाला जावई व मुलीसह परागंदा व्हावे लागले.

वृत्तीच्या संबंधे कलह मांडला। माझा बोलविला भ्रतार हा।।
गोत्रजाची फेडा बाकासाठी ऋण। मागती लिहून शेतमळा।।
आतां येथोनिंया जावें परदेशी। तरीच आम्हांसी सुखं प्राप्ती।।
पिता माता बंधु मजही समवेत। गेले रांतोरात गंगातीरी।।
प्रवरा – संगमी केले गंगा स्नान। घेतले दर्शन सिध्दनाथे।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र.७)

घरामधून बाहेर पडल्यानंतर प्रवरा संगम, पंढरपूर, शिखर शिंगणापूर, रहिमतपूर करीत हे कुटुंब कोल्हापूरला पोहचले. बहिणाबाई म्हणतात, कोल्हापूर येथे हिरंभट नावाच्या एका यजूर्वेदी व्युत्पन ब्राम्हण गृहस्थाच्या घरी आम्ही बि–हाड केले. याच सुमारास जयराम स्वामी वडगावकर कोल्हापूरला तेथे कथा–कीर्तनास आलेले होते. संत बहिणाबाई यांना कथा – कीर्तन ऐकण्याची, भागवत पुराण श्रवण करण्याची संधी मिळाली. एवढेच नाहीतर हिरंभट यांच्या घरी शिकण्यासाठी विद्यार्थी येत होते. त्यांना पडविलेले 'वेदपाठ' हे बहिणाबाईच्या कानी पडत. त्यांतून त्यांना ज्ञान प्राप्त होत गेले.

हिरंभट एक ब्राम्हण वेदांती। दोही शास्त्री गती यजुर्वेदी।।
थोर भाग्यवंत पवित्र अगिनहोत्र। विद्यार्थी सर्वत्र पठन करिती।।
तयाचिये गृही पाहोनिया स्थळी। राहोनी निश्चळ श्रवण होय।।
जयराम गोसावी त्याची हरिकथा। नित्य भागवता श्रवण करु।।
बहेणी म्हणे तेथें करोनिया वास। सदा निजध्यास आत्मचर्चा।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. १३)

अशा प्रकारे संत बहिणाबाईचा काळ अध्यात्म, आत्मविद्येची चर्चा, भागवतपुराणांचे श्रवण, चिंतन, मनन यात जात होता, यातूनच बहिणाबाईचा भक्तिभाव जागृत झाला. ज्ञान कणाकणाने वृध्दिंगत होत गेले.अध्यात्मिक जीवनाला नवी दिशा मिळाली. हिंरंभटाने त्याच्या स्वप्नात झालेल्या दृष्टांताप्रमाणे एक गाय व वासरु दान दिले. बहिणाबाईना वासराचा व गायीचा लळा लागला. कोपिष्ट, तापट स्वभावाच्या रत्नाकरांना बहिणाबाईचा राग आला. त्यांनी बहिणाबाईला मारहाण केली.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

जातीचा भिक्षुक अंतरी बहू राग। धावला सवेग गेहाप्रती।।
धरुनिया वेणी मारिले यथेष्ट। हिरंभटा कष्ट फार झाले।।
नावरे मारितां गायहो ओरडे। वत्स तेही रडे कासाविसी।।
अकरावे वरुष मज होते तेव्हा। काय पतिसेवा अंतरले।।

आपल्या मालकिणीला प्रचंड मारले; म्हणून गाय व वासराने चारा—पाणी बंद केले. शेवटी वासराचा अंत झाला. 'श्लोकार्थ म्हणोनी प्राण वत्स त्यजी। योग लाजलाजी तयापुढें'।। वासराची यथा—विधी अंत्यक्रिया केल्यानंतर बहिणाबाईच्या जीवनात अमूलाग्र बदल झाला. बहिणी म्हणे देह सर्वही विकळ। परि तें निश्चळ चित्त माझें।। कोण्या एका ब्राम्हणाने बहिणाबाई बेशुध्द अवस्थेत असतांना सावध हो म्हणून सांगितले. बहिणाबाई सावध होऊन पाहत तो, आई — बाप व नवरा समोर असल्याचे दिसले, पुन्हा परत बहिणाबाई गुंग झाल्या. मग मात्र त्यांना पंढरी दिसली व तुकारामांचे दर्शन झाले. व स्वप्नात उपदेश दिला. तिच्या मस्तकी हात ठेवून गुरुमंत्र दिला. या घटनेचे वर्णन बहिणाबाई खालीलप्रमाणे करतात.

''ठेवोनिया कर मस्तकी बोलिला। मंत्र सांगितला कर्णरंध्री।।
म्यांही पायांवरी ठेविले मस्तक। दिधले पुस्तक मंत्र गीता।।
कार्तिकात वद्य पंचमी रविवार। स्वप्नींचा विचार गुरुकृपा।।
आनंदले मन चिद्रूपी कोंदले। उठोनी बैसले चमत्कारें।।
मंत्र आठविती तुकोबास्वरुपा। स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली।।
अमृत पाजिलें चवी अनारिसीं। साक्ष ज्याची त्यासी मनामाजी।।
बहिणी म्हणे ऐसी कृपा सद्‌गुरुची। तुकारामे साचे पूर्ण केली''।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. २५)

जयराम स्वामींच्या कथा—कीर्तन श्रवणांचा संत बहिणाबाईवर फार मोठा परिणाम झाला. जयराम स्वामींच्या कीर्तनातींल अभंग बहिनाबाईनी मोठया भक्तीप्रेमाने श्रवण केले. जयराम स्वामीनींच त्यांना तुम्ही 'आळंदीस जावे' असे सांगितले. आता कोल्हापूर आणि परिसरात बहिणाबाईची प्रसिध्दी—कीर्ती पोहचली लोक त्यांच्या दर्शनाला येऊ लागले. हे त्यांच्या नव—यास सहन होणे शक्य नव्हते. रागाने रत्नाकर पाठकांनी वनात जाण्याचे ठरविले. पण ज्या दिवशी जाणार होते; त्याच दिवशी त्यांच्या अंगाला दाह होऊ लागला. असे म्हणतात की, संत तुकारांनीच ब्राहमणाच्या रुपात येऊन तो 'दाह' नाहीसा केला. आणि मग बहिणाबाईच्या नव—यानेही तेव्हापासून तुकारामांच्या सेवेत काळ



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

घालविण्याचे निश्चित केले. शुद्रास गुरु केले म्हणून त्यांनाही कर्मठ लोकांचा त्रास सहन करावा लागला. देहूमध्ये एके दिवशी बहिणाबाईच्या मनात आपण विठ्ठलाच्या मंदिरात ध्यानस्थ होऊन बसावे असा विचार आला. नवरा पुण्यात काही कामानिमित्त गेला असतांना आईची आज्ञा घेतली आणि 'आनंद ओवरी' त तीन दिवस ध्यानस्थ स्थितीत बसल्या. त्या ध्यानामध्ये तुकाराम प्रगट झाले आणि कवित्वाचे त्यांना वरदान दिले.

टाळया चिपोळयांचा ध्वनी आयकतां। आनंद हा चित्ता समावेना।।
लवियले नेत्र निद्रेत जागृती। तुकाराममूर्ती देखियली।।
ठेवियेला हस्त मस्तकी बोलून। दिधले वरदान कवित्वाचे।।
बहिणी म्हणे नेंणे स्वप्नी की जागृती। इंद्रियाच्या वृत्ती विसरल्या।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. ७६)

बहिणाबाई ध्यानस्थ स्थितीतून मूळ स्थितीत आल्या. इंद्रायणीचे स्नान केले. आणि अभंगाच्या ओळी सुचू लागल्या. त्या आनंदाने डोलू लागल्या. पांडुरंगाचे दर्शन घेतले, आणि त्यांची प्रतिभा ओसंडून वाहू लागली. तेव्हापासून किंबहुना त्या क्षणापासून संत बहिणाबाई कवित्व करु लागल्या. त्यांना एक नवे आयुष्य प्राप्त झाले, मनात उर्मी निर्माण झाली, सर्जनशीलता त्यांच्या रोमारोमात संचारु लागली. येथे बहिणाबाईच्या चरित्राचा पूर्वार्ध संपतो. आत्मनिवेदनपर अभंगाची "घेतले दर्शन पांडुरंग मूर्ती। तव झाली स्फूर्ती वदावया।। तुकोबाची तेथें करुनी नमस्कार। आले मी सत्वर बिव्हाडाशी।। बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र। हृदयाकाशी चंद्र बोले वाया"।। सांगता होते. यानंतर मात्र बहिणाबाईच्या चरित्राविषयीचे घटना – प्रसंग अनुत्तरित राहतात.

त्यामधील महत्वाचा प्रसंग म्हणजे संत तुकारामांच्या 'सदेह वैकुंठ गमनाचा प्रसंग' बहिणाबाई यांनी कुठेही सांगितला नाही; याचे निश्चित आश्चर्य वाटते. मग यातून तात्पर्य हेच निघते, की बहिणाबाई तुकारामाच्या सदेह वैकुंठगमनाच्या प्रसंगी देहूत नसाव्यात. प्रस्तुत प्रसंगाच्या अगोदरच केव्हातरी बहिणाबाईनी देहू सोडले असण्याची शक्यता आहे या संदर्भात डॉ. शोभा घोलप लिहितात 'देहू सोडण्याची तीन कारणे संभवतात. पहिले, ज्यासाठी देहूस आल्या ते सद्‌गुरुचे दर्शन त्यांचा वरदहस्त मिळवणे हे सफल झाले होते. दुसरे देहूस येताच काशीचा जन्म झाला होता. शिवाय उदरनिर्वाहाचे कायमचे साधन नव–याला मिळणे देहुसारख्या लहानशा खेडयात कठीण होते. व तिसरे



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

म्हणजे मंबाजी गोसाव्याने या कुटुंबाचा छळ मांडला होता या तीन कारणांस्तव त्यांनी सहकुटुंब देहू सोडले असावे व त्यांचे मूळ गाव शिऊरास येऊन स्थायिक झाल्या असाव्यात[४]'' साधारण येथे त्यांचे आत्मचरित्रात्मक अभंग किंबहुना वृत्तांताची सांगता होते. इतर जे त्यांनी अभंग लिहिले त्यामध्ये आदिपरंपरा, तत्वचिंतन, भक्तिमहात्म्य, उपदेशवर अभंग, ब्रम्हकर्मपर अभंग, संकीर्ण रचना याशिवाय टोणप्याचे अभंग, पदे, गौळणी, भारुडे, श्लोक, आरत्या आणि देवाशी भांडण असणा—या काही रचनांचा समावेश आहे.

संत बहिणाबाईच्या आत्मचरित्रातून आणि इतर अभंगातून व्यक्त केलेला स्त्री—पुरूषांना पतिव्रताधर्माचा उपदेश अत्यंत महत्वाचा आहे. ''प्रपंच परमार्थ चालवी समान। तिनेच गगन झेलियले।। कर्म तेचि ब्रहम तेचि कर्म। ऐसे जिणे वर्म जाणितले।। प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीला बहिणाबाई महत्व देतात; त्यामधून त्यांची लौकिक जीवनावर असलेली निष्ठा आणि कर्माला दिलेले प्राधान्य उल्लेखनिय वाटते.

'निर्याणपर अभंग' हा देखील बहिणाबाईच्या आत्मचरित्राचा एक भाग आहे. यात पूर्वजन्मीची हकीगत, विठ्ठलाला मागील बारा जन्माची कहाणी येते. संत तुकारामांच्या निर्याणपर अभंगाचा प्रभाव बहिणाबाईच्या निर्याणपर अभंगावर आहे.

थोडक्यात संत साहित्यात ब—याच संतानी आत्मनिवेदनपर अभंग लिहिलेले आहेत. उदा. नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, रामदास, बहिणाबाई यांचा या दृष्टीने अभ्यास करता येतो. परंतु बहिणाबाईच्या आत्मनिवेदनपर अभंगात वैचारिकता, सुसंगतपणा, सलगता, नेटकेपणा आहे, त्याला आत्मचरित्राचे स्वरूप प्राप्त झाले आहे. बहिणाबाईच्या रचनेतून सहज उस्फूर्तता, भावनांची उत्कटता, शब्दयोजनेतील लयबध्दता, भाववृत्तीची एककेंद्रीतता या वैशिष्टयामुळे हे आत्मचरित्र प्रशसनीय ठरले आहे. दि. पु. चित्रे म्हणतात, त्या प्रमाणे आत्मचरित्राचा उद्देश— मानवी जीवनाच्या ज्या अंगाची माहिती त्या—त्या व्यक्तीने स्वत: स्वभाषेत व्यक्त केल्याशिवाय व्यक्त होऊ शकणार नाही, ते अंग प्रगट करणे हा आत्मचरित्राचा मुख्य उद्देश होय सत्य असत्याशी मन केले ग्वाही[५]'' म्हणून मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील त्या पहिल्या स्त्री आत्मचरित्रकार ठरतात. बहिणाबाईच्या आत्मचरित्रात स्त्रीत्वाचे गुण दिसतात. या आत्मचरित्राचा आणखीन महत्वाचा विशेष म्हणजे हे आत्मचरित्र तुकोबाभोवती फिरत असल्याने ते संत तुकारांच्या चरित्राचे



College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

अस्सल साधन आहे. सदानंद मोरे म्हणतात, ''तुकोबाच्या अन्य कोणत्याही समकालिनाने तुकारामांविषयी इतके चरित्रात्मक तपशील पुरवलेले नाहीत[६]''.

संत बहिणाबाईच्या काव्यातील **विद्रोह** :—

संत तुकारामांचा दृष्टांत झाल्यामुळे बहिणाबाईचे अध्यात्मिक जीवन उजळून निघाले. तुकोबाचे अध्यात्मिक सामर्थ्य होते; याचा प्रत्यय त्यांना आला. चातुवर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्था, आणि पुरुषप्रधान संस्कृती. यामुळे संत बहिणाबाईना प्रचंड त्रास सहन करावा लागला. हा त्रास दोहेरी स्वरुपाचा होता. त्यामध्ये कुटुंब आणि समाज. हे दोन ध्रुव होते. संत बहिणाबाईच्या विद्रोहात रचना प्रकारानुसार वेगळेपणा जाणवतो कधी तो विद्रोह संयत आहे तर कधी त्याचे स्वरूप तीव्र होते. रा.ग.जाधव मराठी संताच्या विद्रोहाच्या अनुषंगाने लिहितात..... ''विकसनशील इहवादाची चिरप्रेरक प्रतिमा म्हणजे विद्रोह. इहवादी श्रध्देतून विद्रोहाचा जन्म होतो. मराठी संताचा विद्रोह हा परंपरागत धार्मिक परंपरेचे इहवादीकरण, म्हणूनही आपण पाहू शकतो विद्रोहाचे नाते कोणत्याही धर्माशी, धर्मपंथाशी व धर्मसदृश्यकहर प्रणाल्यांशी जुळत नाही आणि जुळलेच तर धर्मकल्पनांच्या प्रस्थापित रूढीच्या सर्वकष परिस्करणाशीच जुळू शकले त्यांचे खरे नाते माणूस म्हणून असणा—या माणसांच्या माणूसपणाशी असते.[७]'' संत तुकारामां सारख्या शुद्रास गुरु केल्यामुळे आपली बायको बिघडली असा कांगावा त्यांच्या तामसी, रागीट स्वभावाच्या नव—याने केला.

भ्रतार म्हणतसे आम्ही की ब्राम्हण। वेदाचे पठण सदा करु।।
कैसा शुद्र तुका स्वप्नींचे दर्शन। बिघडली पत्नी काय करु।।
कैसा जयराम कैंचा पांडुरंग। माझा झाला भंग आश्रमाचा।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. ३२)

आम्ही वेदपठण करणारे ब्राम्हण असताना पत्नी शुद्र तुकारामांची स्वत: शिष्य म्हणवून घेते. शिवाय तुकारामांचा स्वप्नात दृष्टांत झाला असेल तर हिची प्रतिष्ठा वाढेल तेव्हा आपल्याला कोण विचारणार? हा पुरुषी अहंकार रत्नाकर पाठकाच्या मनात असणे, त्याच्या स्वभाववरुन स्पष्टपणे जाणवते. कसला जयराम आणि कसला पांडुरंग? आम्ही भिक्षूक आहोत. संत, साधू, भक्ती हे शाक्तपंथीय नव—याला आवडणे अगदी दुरापास्त. पुरुष गुरु करणे आणि तो ही शुद्र ब्राहमणी समाजाचे वर्चस्व असणा—या परिस्थितीत नव—याला रुचणे शक्य नव्हते. समाजालाही ते मान्य नव्हते. बहिणाबाईनी आपली गुरुपरंपरा गाथेच्या पहिल्याच अभंगातून



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

दिलीआहे.

आदिनाथ—गोरखनाथ—गहिनीनाथ—निवृत्तीनाथ—ज्ञानेश्वर—सच्चिदानंद—विश्वंभर—राघवचैतन्य—केशव चैतन्य—बाबाजी चैतन्य—तुकाराम—बहिणाबाई— या गुरुपरंपरेकडे नजर टाकली तर संत बहिणाबाईच्या अगोदरची सर्व मंडळी पुरुष आहेत. हेही इथे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजेच गुरु संत तुकाराम हे केल्यामुळे बहिणाबाईना समाज आणि कुटुंबातून नव—याचा प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला पण त्यातून ही बहिणाबाई डगमगल्या नाहीत.

संत बहिणाबाईच्या पूर्वी वारकरी संप्रदयात संत मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, सोयराबाई, कान्होपात्रा इत्यादी संत कवयित्रींनी अभंगरचना केली आहे. परंतु उपरोक्त संत कवयित्रीपेक्षा बहिणाबाईची कविता अधिक परखड आहे. संत तुकारामांच्या विचारांचा त्यांच्या स्पष्टवक्तेपणाचा प्रभाव बहिणाबाईवर पडलेला दिसतो. या संदर्भात डॉ. सतीश बडवे लिहितात ''साहजिकच तुकाराम शिष्या बहिणाबाई अन्य स्त्री संतकवयित्रीपेक्षा अधिक स्पष्टपणे लेखन करताना आढळते. बहिणाबाई किंवा बहेणाबाई ही शुद्र तुकारामाची ब्राहमण शिष्या. खरे तर संत स्त्रियांनी पुरुष संता पेक्षा भिन्नमांडणी केली आहे. हे लक्षात घेतले तर त्यांच्या विद्रोही विचारांची / आचारांची संगती लावता येते. स्त्रीवादी चळवळींनाही संत स्त्रियांच्या कामगिरीची फारसी दखल घ्यावीशी वाटलेली दिसत नाही. संत स्त्रियांचा लढा जसा जातिभेदा विरुध्द तसाच तो लिंगभेदा विरूध्द होता हे वास्तव लक्षात घेणे आवश्यक आहे.[८]''

आपण वैदिक ब्राहमण आहोत लोक आपल्याला मान — सन्मान देतात. आपण थोर वेदांती ज्ञानी आहोत! साधुसंत, भक्त हे कोण? अशी रत्नाकर निंदा करीत असे. सतत बहिणाबाईना शाब्दिक टोमणे देत असे.

म्हणे ही बाईल मरे तरी बरे। ईस का पामरे भेटताती।।

प्रस्तुत आत्मचरित्रातून पुरुषी अहंकार, गर्व वेळोवेळी बहिणाबाईनी व्यक्त केलेला आहे. त्यांना जे सहन करावे लागले, ते त्यांनी प्रांजळपणे मांडले आहे. एकूणच स्त्रियांचे तत्कालीन समाजातील स्थान हे दुय्यम असल्यामुळे त्यांना विलक्षण छळ सोसावा लागला. मनाला येईल तेव्हा रत्नाकर बहिणांबाईना मारझोड करीत असे.

आले मना तेव्हा मारिले बळकट।
बांधोनिया मोट टाकियेली।।
बहिणी म्हणे माझे चित्त कासावीस।



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

संसाराचा त्रास बहू झाला।।

उपरोक्त पद्यपंक्तीकडे फार लक्ष वेधले तर बहिणाबाईची मनोवृत्ती ही बंडखोर किंबहुना विद्रोही आहे असेच म्हणावे लागेल. संसाराचा 'त्रागा' सहन न होऊन ही जरी विधाने त्यांच्या काव्यात येत असली तरी त्याकडे समीक्षकांनी व्यापक अर्थाने पाहणे गरजेचे आहे. तत्कालीन परिस्थितीत आपल्या पतीच्या व्यवहाराविषयी उघडपणे बोलणे, किंवा मंबाजी विषयी उघडपणे, लिहिणे हा बहिणाबाईचा विद्रोही विचार आहे; भले तो परमार्थ प्रवण विचारातून मांडला गेला असला तरी, तत्कालिन एकूण साहित्य—समाज, संस्कृती किंबहुना एकूणच परिस्थिती 'धर्म भावनेशी निगडीत होती हे जर मान्य केले तर बहिणाबाईच्या विचारांची व्यापकता नजरेत भरण्यासारखी निश्चितच आहे. ''बहिणी म्हणे माझे चित्त कासावीस संसाराचा त्रास बहू झाला. हिरंभट म्हणे व्हा तूम्ही बाहेरी। हा दिसेल हत्यारी चांडाळ की। (संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. १६) या विधानातून डॉ. सतीश बडवे म्हणतात त्याप्रमाणे ''यातून तिचे बंड करणारे मन लक्षात घेता येते. स्त्रीवादी अथवा बंडखोर मनोवृत्तीच्या अंगाने या विधानाची समीक्षा केली. तर कदाचित तो स्त्रीमुक्तींच्या विचाराचा पदराव ठरू शकतो. तथापि केवळ धर्मजाणिवेचे वाङ्.मय म्हणून संत स्त्रियांच्या उद्गारकडे सरळ — सरळ पाठ फिरवली जाते.[९]''

संत बहिणाबाईच्या अभंगवाणीतील विचारांचा व्यापकपणे, विविध अंगाने विचार केला तर त्यांच्या विचारांची, क्रातिकारकत्व, विविधता लक्षात येऊन अनेक पदर उलगडतील यात दुमत नाही. तत्कालीन प्रचलित समाजव्यवस्थेत 'स्त्री' कशी पराधीन आहे. तिचा हुंकार कोंडला आहे. कुटुंबव्यवस्थेत तिची प्रचंड गळचेपी होते.

स्त्रियेचे शरीर। पराधीन देह।।
न चाले उपावे। विरक्तीचा।।
शरीराचे भोग। वाटतात वैरी।।
माझी कोण करी। चिंता आता।।
वाटे देह आता। घालू अग्निमाजी।।
किंवा दाही दिशा। उल्लंघाव्या।।
बहिणी म्हणे माझा। जीव हा तळमळी
कारे वनमाळी। मोकलिसी।। (संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र.६०)

संसारातील ताणे—बाणे, ताणताणव, असहायता याचे वर्णन त्या करतात. 'दाही दिशा उल्लघांव्या' या पंक्तीतून त्यांचा विद्रोह व्यक्त



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

होतो. जीवनातील संघर्ष, सोशिकता, प्रगल्भता आणि त्याला सामोरे जाण्यासाठी असणारा धीरोदत्तपणा त्यांच्या काव्यातून साकार झाला. 'घर' म्हणजे स्त्रीच्या दृष्टीने परामार्थमार्गातील फार मोठा अडथळा असा अनुभव बहिणाबाईला आला. 'बोलु नये बोल पराकिया संगे'। 'भ्रतार तो अंगे जमदग्नी' ही त्यांची अवस्था झाली.

'वज्रसुचिकोपनिषद' हे जन्मजात ब्राहमण्यावर कडक टीका करणारे उपनिषद म्हणून ओळखले जाते, त्याचा बहिणाबाईनी अनुवाद केला. ब्राहमणत्व हे केवळ जाती ज्ञान, कर्म, धर्म यांनी सिध्द हात नाही हे त्यांनी ठणकावून सांगितले. संत बहिणाबाईचे 'ब्रहमकर्मपर अभंग' हे वज्रसूचिकोपनिषादाचाच अनुवाद आहे. ब्रहमपर अभंगातून त्यांनी सांगितलेला वेदांत ही क्रांतिकारक व अलौकिक घटनाच म्हणावी लागते. असे मत सुरेश शिंदे मानतात[१०]. 'वज्रसूचिकोपनिषद' या शीर्षकाचे नवीन उपनिषद आहे. त्याचा कर्ता अज्ञात आहे. ते कधी लिहिले हे देखील सांगता येत नाही. साधारण नवव्या शतकाच्या अगोदर कधीतरी निर्माण झाले असावे. 'ऐकीव माहितीनुसार त्याचा कर्ता अश्वघोष मानतात. डॉ. रा. चिं ढेरे[११]'' यांनी 'वज्रसूचिकोपनिषद' यावर समग्र संशोधन करून 'वज्रसूचीचे आघात' या शीर्षकाचा विस्तृत लेख 'संत साहित्य व लोकसाहित्य या ग्रंथात समाविष्ट केला आहे.

बहिणाबाई यांनी वज्रसूचिकोपनिषदाचा सरळ—सरळ १८ अभंगात अनुवाद केला आहे. 'ब्राहमण कोणास म्हणावे'? हा याचा मुख्य विषय आहे. जीव, देह, जाती ज्ञान, कर्म, धार्मिकता यापैकी कशाने ब्राहमणत्व सिध्द होते? असा प्रारंभी प्रश्न निर्माण करून क्रमाक्रमाने उपरोक्त मुद्दयाचे तर्कावर आधारित खंडन केले आहे. बहिणाबाईना जातिभेदाविषयी होणा—या अन्यायाविषयी बोलणे किंवा लिहिणे अवघड होते. हे बहिणाबाईनी लीलया पार पाडले.

ब्रहमभाव देही सदा सर्व काळ। ब्राहमण केवळ तोचि एक।।
बहिणी म्हणे ब्रहमी नांदे तो ब्राहमण। यातीशीं प्रमाण नसे तेथे।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. ४२७)

केवळ जातीचे श्रेष्ठतव मनाशी धरून 'तोरा' मिरवायचा हे बहिणाबाईनी स्वत: नव—याच्या वर्तनात पाहिले होते. केवळ ज्ञानी तोही ब्राहमण नाही. ज्याच्या ठिकाणी दया, प्रेमभाव, ब्रहमत्व आहे तो ब्राहमण होय. कोणाला ब्राहमण म्हणू नये आणि कोणाला ब्राहमण म्हणावे? या संदर्भात बहिणाबाई लिहितात......



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

स्वर्गलोकप्राप्ति होय जया धर्मे। ब्राहमण उत्तम ते ही नव्हती।।
नाना यज्ञ, दान अनुष्ठान तप। ब्राहमणाचे रूप ते ही नोहे।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र. ४२१)

तो चि गा ब्राहमण ओळखावा जनी। व्दैत जया स्वप्नी आढळेना।।
षड्र्मीत षट्भाव नातळे। दोषांचेही मेळें सापडेना।।
बहिणी म्हणे सत्य न संडी सर्वथा। ब्राहमण तत्वता तो चि एक।।
बहिणी म्हणे काम क्रोध सर्व गेले। तेथें चि राहिले ब्राहमणत्व।।
(संत बहिणाबाईचा गाथा, अ.क्र.४२२,४२५)

थोडक्यात संत बहिणाबाईची अभंगाची वरील प्रातिनिधीक स्वरूपातील 'चरण' पाहिली तर याती जातीचा ब्राहमण असण्याशी काहीही संबंध नाही, किंबहुना त्या मानत नाहीत. ज्याच्याकडे विषमता, भेदभाव नाही, ज्याची वासना उरली नाही, जो सत्याची कास धरतो ज्याचे षड्विकार संपले आहेत तोच खरा ब्राहमण होय, हे बहिणाबाई निक्षून सांगतात. 'वज्रसूची' संदर्भाने तारा भवाळकर लिहितात, ''बहिणाबाईसह एकूणच संत परंपरेवर वज्रसूची फार मोठा प्रभाव आहे. त्यांना प्रत्यक्षात ही संहिता माहित नसली तरी इ.स.च्या नवव्या — दहाव्या शतकापासून या विचाराचा प्रभाव विवेकी मनात झिरवत—प्रसरण पावत आला असणार यात शंका नाही.[१२]'' संत बहिणाबाई नी वज्रसुचिकोपनिषदाचा अनुवाद करणे हे फार मोठी धाडसाची गोष्ट आहे. आजच्या लोकशाहीत किंवा काळाशी तुलना केली तर वज्रसुचिचे महत्व अनन्यसाधारण आहे.

**संदर्भसूची**

१. बेंद्रे वासुदेव सीताराम, तुकाराम महाराज यांचे संत सांगाती, मौज प्रकाशन गृह, पहिली आवृत्ती १ एप्रिल १९५८, पृष्ठ — ८४.
२. श्री संत वहिणाबाई यांचा अभंगाचा गाथा, तिसरी आवृत्ती, २०१०, प्रकाशकाचे निवेदन.
३. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड्.याचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ — १७४.
४. घोलप शोभा, संत तुकारामांचा शिष्यपरिवार, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, २८ जुलै १९९९, पृष्ठ — ३१.
५. चित्रे दिलीप पुरूषोत्तम, पुन्हा तुकाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९९५, पृष्ठ — ३२.
६. मोरे सदानंद, तुकाराम दर्शन, पुन:प्रकाशन. २०१४, पृष्ठ — ३२.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN-978-93-91305-33-8

७. जाधव रा.ग., अध्यक्षीय भाषण: ७७ वे अ.भा.म.सा.सं. औरंगाबाद, पृष्ठ – ३२.
८. बडवे सतीश, मध्ययुगीन साहित्याविषयी, मीरा बुक्स अँड पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती,१६ मे २०१०, पृष्ठ – १५२.
९. तत्रैव पृष्ठ – १५२.
१०.शिंदे सुरेश, संताचा विद्रोह, ग्रंथाली प्रकाशन, पहिली आवृत्ती, पृष्ठ – ३२३.
११.ढेरे रा. चिं, संतसाहित्य व लोकसाहित्य, पृ. ९९.
१२.भवाळकर तारा, मुक्तिमार्गाच्या प्रवासिनी (संत कवयित्रींची) मुक्ति संकल्पना, द युनिक अ‍ॅकॅडमी पब्लिकेशन प्रा.लि. पुणे पृष्ठ – ४२.

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad